सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन

## तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,
मॉडेल कॉलनी , बहिरट पाटील चौक, शिवाजी नगर, पुणे -४११०१६

दूरध्वनी क्र. (०२०) २५६५६२३४ Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

जा. क्र : तंशिविकापु/शै.वि.-५/२०२४/ ३८०७ दिनांक : 25 SEP 2024

**परिपत्रक-**

**प्रति,**
प्राचार्य,
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त पुणे जिल्हयातील
सर्व संस्था, पुणे विभाग.

**विषय :** आगामी विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४
आंतरराष्ट्रीय लोकशाही दिनानिमित्त मतदार जनजागृती करणेबाबत...

संदर्भ : मा.जिल्हाधिकारी उभूसक्र.१३, पुणे यांचे कार्यालयाचे पत्र क्र.उभूसंक्र.१३/आस्था-१/कावि/३१/२०२४ दि.२०.०९.२०२४

या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त पुणे जिल्ह्यातील सर्व संस्थांना कळविण्यांत येते की उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये आगामी विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने जिल्ह्यांत मतदार जनजागृतीपर उपक्रम मोठ्या प्रमाणात राबविण्यांत येत आहेत. दरवर्षी दि. १५ सप्टेंबर हा दिवस आंतरराष्ट्रीय लोकशाही दिवस म्हणून साजरा करण्यांत येतो. आंतरराष्ट्रीय लोकशाही दिनाच्या पार्श्वभूमीवर सुदृढ लोकशाहीसाठी मतदारांचे अधिकार व कर्तव्यावर जागृती करणे आवश्यक आहे. या अनुषंगाने आगामी विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या दृष्टीने मतदार जनजागृती करण्यांत यावी.

याकामी आपले महाविद्यालयातील युवा मतदारांनी अधिक सजग राहून मतदानाचे आपलेकर्तव्य पार पाडून मतदानाची टक्केवारी वाढावी म्हणून जास्तीत जास्त मतदार जनजागृतीपर कार्याक्रमांचे आयोजन करण्यांत यावे. जिल्हात महाविद्यालयामध्ये नवयुवा मतदारांची मतदार नोंदणी करण्यांत आली असून त्यांना मतदान करण्यासाठी आंतरराष्ट्रीय लोकशाही दिनानिमित्त विशेष जनजागृतीपर कार्याक्रमांचे आयोजन करावे. यामध्ये युवकांसाठी मतदार जागृतीपर वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, मिम स्पर्धा, ग्राफीटी स्पर्धा, पोस्टर स्पर्धा, पथनाट्य स्पर्धा, घोषवाक्य स्पर्धा, आदींचे आयोजन करण्यांत यावे.

दिव्यांग मतदारांना मतदान करणे सुलभ व्हावे याकरिता केलेल्या उपाययोजनांची माहिती यावेळी युवकांना देण्यांत यावी. तसेच दिव्यांगांसाठी सुरु करण्यांत आलेल्या ९२२६३६३००२ या हेल्पलाईनबाबत देखील माहिती देण्यांत यावी.

मा. भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार दि. १०/०९/२०२४ ते ०९/१०/२०२४ या कालावधीमध्ये नागरिकांसाठी EVM व VVPAT प्रात्यक्षिक मोहिमेचे आयोजन करण्यांत आले असून त्या द्वारे मतदारामध्ये EVM व VVPAT यंत्राच्या सुरक्षितता व पारदर्शकते बाबत विश्वास निर्माण करून त्यांच्या शंकांचे निरसन करण्यांत येत आहे. तसेच आपल्या महाविद्यालयामध्ये संबंधित विधानसभा मतदारसंघांशी संपर्क साधून महाविद्यालयामध्ये युवकांसाठी EVM व VVPAT प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यांत यावे.

तरी आंतरराष्ट्रीय लोकशाही दिनानिमित्त घेण्यांत आलेल्या मतदार जनजागृतीपर कार्यक्रमांचा फोटोसहित अहवाल slaopune13@gmail.com या ई-मेलवर सादर करण्यात यावा.

(डॉ.द.व्यं.जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत - १. प्रोग्रॅमर तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.